# इतिवृत

दिनांक 4/11/2020

आज दिनांक 4/11/2020 रोजी सकाळी 10.30 वाजता जिल्हा उद्योग केंद्र नांदेड येथे महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद अंतर्गत जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेची बैठक आयोजित करण्यात आली होती .सभेस सोबतच्या यादी प्रमाणे सन्मानिय सदस्य हजर होते.सभेत खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

सर्वप्रथम श्री किरण जाधव महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र नांदेड यांनी उपस्थित सर्व सदस्याचे स्वागत करून शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील लघू व मध्यम उदयोगांना आंतरराष्टीय व्यापारामध्ये सहाय्य करण्यासाठी तसेच जिल्ह्यातील संभाव्य निर्यात क्षमता असलेल्या विविध क्षेत्रामधून निर्यातवृध्दी होण्यासाठी आणि निर्यातदारांमध्ये जागरूकता आणून त्यांना स्पर्धात्मक बनविण्यासाठी तसेच जिल्ह्यातील निर्यातीला चालना देण्याचे दृष्टीने तसेच उदयोगांना येणा-या अडचणी सोडविण्यासाठी जिल्ह्यात जिल्हा निर्यात प्रचालन परिषदची स्थापना करण्यात आली आहे. जिल्हयातील निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये ,आदयौगिक संघटना,निर्यात परिषदा , निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा,समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्यासाठी शासन निर्णयामधील मुददा क्र. ५ नुसार नांदेड जिल्हयात मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेची" समिती गठीत करण्यात आली आहे असे सांगितले तसेच समितीचा उद्देश ,रचना सांगून सर्व सदस्याचा परिचय करून देण्यात आला.

यानंतर श्री लोकेश JOINT DGFT यांनी नवीन व जुन्या निर्यातदार उद्योजकाकडे जाऊन त्यांच्या अडीअडचणी जाणून घेणे ,university,college व वेगवेगळ्या institution कडे जाऊन Export Importance सांगणे,क्लस्टर Identify करून product अडचणी समजून घेणे ,Export Service पुरवणे,Regular Interaction करून संबधित यंत्रणेकडे पाठविणे ,आवश्यक प्रशिक्षण देणे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यानंतर श्री इंगेवार MSME यांनी भारत सरकारच्या निर्याती बाबत सर्व योजनाची माहिती सांगून उद्योजकांना निर्याती बाबत मदत करण्याचे आश्वासन दिले.

यानंतर श्री राजेश धुर्वे AGM. NABARD यांनी कृषी आधारित उद्योगांना जिल्ह्यात असणारा वाव व NABARD तर्फे उपलब्ध विविध सवलती बाबत चर्चा करण्यात आली.

यानंतर श्री प्रविण खडके व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र नांदेड यांनी नांदेड जिल्ह्यात असलेल्या Potential Areas For Exports जसे कृषी आधारित उद्योग,स्टील व लाकडी फर्निचर ,सीमेंट प्रॉडक्ट,टेक्सटाइल,प्लास्टीक प्रॉडक्ट,इंजिनियरिंग इत्यादि बाबत माहिती सांगितले

श्री बंगाली अध्यक्ष लघु उद्योग संघटना यांनी उद्योजकांना निर्यातीबाबत येणाऱ्या अडचणी बाबत बैठकीत मुद्दे उपस्थित केले .यावर श्री किरण जाधव महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र नांदेड यांनी सर्व अडथळयावर मात करून आतरराष्ट्रीय निर्यातीबाबत व्युहरचना करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

सर्वात शेवटी श्री अनिल कदम उद्योग निरीक्षक जिल्हा उद्योग केंद्र नांदेड यांनी उपस्थित सर्व सदस्याचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक ~~तथा सदस्य सचिव जिल्हा~~
निर्यात प्रचालन परिषद समिती जिल्हा उदयोग केंद्र, नांदेड..